| | | | |
|---|---|---|---|
| MHPU120000342022 | दाखल दिनांक | : | १०/०१/२०२२ |
| | नोंदणी दिनांक | : | १०/०१/२०२२ |
| | निकाल दिनांक | : | २२/०७/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०४ ०६ १२ |

**भोर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी सौ. मिना वामन जाधव )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ०९/२०२२. निशाणी क्र. ४१**

**गुन्हा नोंद क्र. १८६/२०२१ भोर पोलिस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | **:<br>:** | **महाराष्ट्र शासन तर्फे भोर पोलीस स्टेशन,** |
| **अभियोगपक्षातर्फे प्रतिनिधीत्व** | **:<br>:** | **विशेष सहा. सरकारी अभियोक्ता<br>श्री. एस.एम. आरणे.** |
| **आरोपी** | **:<br>:** | **१. शहाजी चंद्रकांत मरगळ<br>वय- ४५ वर्षे, व्यवसाय- -<br>रा. हागारवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे<br><br>२- तात्या रामा पवार<br>वय- २४ वर्षे, व्यवसाय- -<br>रा. शेळगांव, ता. इंदापुर, जि. पुणे** |
| **आरोपी तर्फे प्रतिनिधीत्व** | **::** | **ॲड.श्री. आर. सी. कोंडे** |

**भाग – ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७.११.२०२१ |
| फिर्याद दाखल तारीख | २७.११.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १०.०१.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ०९.०२.२०२२ |

| | |
|---|---|
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२.०८.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याची तारीख | २२.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय तारीख | २२.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भातील आदेशाची तारीख | निरंक. आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शहाजी चंद्रकांत मरगळ** | आरोपींना फौ.प्र.संहितेचे कलम ४१(अ) १ प्रमाणे नोटीस देवुन सोडण्यात आले. | दि. १५.०१.२०२२ | महाराष्ट्र प्राणी रक्षण अधि. १९७६ चे कलम ५(अ),५(ब),९, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधि. १९६० चे कलम ११(१)(डी)(इ), भा.दं.वि. कलम ३४ अन्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |
| २ | **तात्या रामा पवार** | | दि. १५.०१.२०२२ | | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग – क
## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये) अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार

**अ. अभियोग पक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | अक्षय विठ्ठल पवार | १९ | तक्रारदार |
| २. | राहुल गौतम मखरे | २४ | साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | निलेश मधुकर आवाळे | २५ | पंच साक्षीदार |
| ४. | प्रतिक गणेश जगताप | ३२ | साक्षीदार |
| ५. | उध्दव मारुती गायकवाड | ३४ | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्ष –**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

**अ.अभियोग पक्षामार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | २०/पी.डब्ल्यु.१ | फिर्याद |
| ०२. | २१/पी.डब्ल्यु.१ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ०३. | २६/पी.डब्ल्यु.३ | जप्ती पंचनामा |
| ०४. | ३५/पी.डब्ल्यु.५ | आरोपींना दिलेली फौ.प्र.सं.कलम ४१ (अ) १ प्रमाणेची नोटिस |

**ब.बचाव पक्षामार्फत निशाणी –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क.न्यायालया मार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| |
|---|
| निरंक |

**ड. भौतिक वस्तु**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | | |

**–:: <u>न्या य नि र्ण य</u> ::–**

(दिनांक २२/०७/२०२६ रोजी पारीत)

आरोपी हे महाराष्ट्र प्राणीरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ),५(ब),९, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधि. १९६० चे कलम ११(१)(डी)(इ), भा.दं.वि. कलम ३४ अन्वये गुन्हयाचे संपरीक्षेस सामोरे जात आहेत.

०२. अभियोगपक्षातर्फे एकुण ५ साक्षीदार तपासले आहेत. आरोपींनी त्यांच्या बचावाच्या पुष्ठ्यार्थ पुरावा सादर केलेला नाही. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ नुसार जबाब नोंदवला असून त्यामध्ये त्यांनी सदर घटनेशी त्यांचा काहीएक संबंध नसल्याचे, फक्त ते स्थानिक रहिवासी नसलेमुळे त्यांचे विरुध्द खोटी केस दाखल करुन खोटा तपास करुन दोषारोपपत्र दाखल करुन त्यांचेविरुध्द सर्व साक्षीदारांनी खोटी साक्ष दिलेली असुन त्यांना ती मान्य नसल्याचे त्यांनी म्हंटले आहे. तसेच त्यांनी त्यांची निर्दोष मुक्ताता करण्यात यावी अशी विनंती केली आहे. अभियोगपक्षातर्फे श्री. आरणे आणि आरोपीतर्फे श्री. आर.सी.कोंडे यांचा युक्तीवाद ऐकला.

०३. आरोपींविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा पाहता खालील प्रश्न माझ्या विचाराधीन येतात त्याचे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय की, दि. २७/११/२०२१ रोजी सकाळी ०७.०० वा. चे सुमारास भोर येथील ट्रॅंगल चौकात थांबले असताना महाड बाजुकडुन शिंदेवाडी बाजुकडे एक महिंद्रा पिकअप गाडी नं. एम.एच. ४२ बी ४२०३ हयामध्ये एकुण ७ बैले (खोंड) ही दाटीवाटीने कोंबुन त्यांची चारा पाण्याची कोणतीही सोय न करता महाराष्ट्र प्राणीरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ),५(ब),९, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधि. १९६० चे कलम ११(१)(डी)(इ), भा.दं.वि. कलम ३४ अन्वये अपराध केला ? | **...नाही.** |
| ०२. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**–:: <u>का र ण मी मां सा</u> :–**

**<u>प्रश्न क्रमांक १ करीताः–</u>**

०४. अभियोगपक्षामार्फत सदर गुन्हा शाबीत करणेकामी एकुण ५ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. अभियोग पक्षाने निशाणी क्र. ३६ येथे पुरशिस देउन पुरावा बंद केला.

०५. फौजदारी न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोगपक्षावर असुन अभिलेखावरील पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीस दिला जातो.

०६. भारतीय पुरावा अधिनियमानुसार आरोपीवरील अपराधाचे शाबीतीसाठी अभियोगपक्षाला साक्षीदारांच्या संख्येची आवश्यकता नाही. अभियोगपक्ष केवळ एका साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अपराध शाबीत करु शकतो. अभियोगपक्षास त्यानुसार अपराध शाबीत करण्यासाठी सादर केलेला साक्षीदाराचा पुरावा सक्षम व विश्वासार्थ असायला पाहिले जेणेकरुन त्यावर विसंबून राहून अपराध शाबीत होत आहे याव्यतिरीक्त दुसरा निष्कर्ष काढता येणार नाही.

०७. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा. क्र.०१ अक्षय विठ्ठल पवार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरची घटना दि. २७.११.२०२१ रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास ए.टी.कॉलेज येथील ट्रॅंगल चौकात घडली. त्याठिकाणी त्यांचे सहकारी रोहित देशमाने, प्रतिक जगताप, मंगेश कुंभार व ते चहा प्यायला थांबले होते. त्यावेळी तेथे महिंद्रा पिकअप क्र. एम.एच. ४२ बी ४२०३ ही महाड रोड वरुन शिंदेवाडी कडे जात असताना त्याला थांबवण्यात आले. त्याची विचारपुस केली असता त्याने त्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांना त्याच्यावर संशय आला म्हणुन त्यांनी पोलिसांना फोन केला व पोलिसांच्या मदतीने गाडी पोलिस स्टेशन येथे घेवुन गेल्यानंतर त्यांना गाडीमध्ये एकुण सात जनावरे त्यामध्ये एक खोंड सहा जर्सी गाय असुन त्यांना दाटीवाटीने कत्तलीसाठी नेत असल्याचे समजले. गाडीत हजर असलेल्या लोकांची नावे तात्या पोवार व शहाजी मरगळ असल्याचे त्यांना समजले. पिकअप वाहन शहाजी मरगळ यांचे होते. आरोपींनी जनावरे खरेदी केली होती. त्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द फिर्याद निशाणी क्र. २० व छापील प्रथम खबर अहवाल निशाणी क्र. २१ दिली.

०८. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा. क्र.०२ राहुल गौतम मखरे यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि. २७.११.२०२१ रोजी ते भोर पोलिस ठाणे येथे रिझर्व डयुटी करीता हजर होते. त्यादिवशी फिर्यादी व त्यांचे मित्रांनी पोलिस स्टेशनला येवुन त्यांना सांगितले की,

त्यांनी गुरे भरलेली गाडी थांबवलेली आहे. त्यानंतर ते त्याठिकाणी गेले. तेथे त्यांनी गुरे कोंबलेली गाडी बघितली. त्यानंतर सदर वाहन त्यांनी पोलिस स्टेशनला आणले. त्यानंतर सदर बाब त्यांनी त्यांच्या वरीष्ठांना सांगितली. त्यांनी पुढील कार्यवाही केली. त्यानंतर आरोपीविरुध्द गुन्हा दाखल झाल्याचे त्यांना समजले. तपासी अंमलदार यांनी सदर साक्षीदाराचे तपास टिपण नोंदवले.

०९. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा. क्र.०३ निलेश मधुकर आवाळे यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यांचे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झाले आहे. पोलिसांनी त्यांना दि. २७.११.२०२१ रोजी दुपारी ०१.०० वाजताच्या दरम्यान पोलिस ठाणे येथे बोलावले होते. त्याप्रमाणे ते तेथे गेले. तेथे इतर पोलिस व पंच गौरव शेडगे इत्यादी उपस्थित होते. तेथे गुरांची गाडी पकडल्याने त्यांना बोलवले होते. तेथे पिकअप गाडी क्र. एम.एच. ४२ बी ४२०३ यामध्ये ७ गायी, खोंडे आणि वासरे होती. तेथे पोलिसांनी त्यांचा जप्ती पंचनामा निशाणी क्र. २६ केला.

१०. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा. क्र.०४ प्रतिक गणेश जगताप यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, घटना दि. २७.११.२०२१ रोजी रात्री १२ वाजण्याच्या दरम्यान महाड नाका येथे घडली. त्यावेळी ते, अक्षय पवार, रोहित देशमाने आणि योगेश कुंभार असे महाड नाक्यावर उभे होते. तयावेळी त्यांना संशयित पिकअप गाडी दिसली. त्यांनी ती गाडी अडवली. त्यामध्ये एक गाय आणि सहा बैल अशी जनावरे दिसली. पिकअप चालक मरळ यांस विचारणा केली असता त्याने उलट उत्तरे दिली. त्यानंतर ते भोर पोलिस स्टेशन येथे फोन केला. त्यानंतर पोलिसांनी चौकशी केली आणि पिकअप वाहन पोलिस ठाणे येथे नेले. त्यानंतर अक्षय पवार यांनी तक्रार दाखल केली. पोलिसांनी घटनेसंदर्भाने त्यांचे तपास टिपण नोंदवले.

११. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले सा. क्र.०५ उध्दव मारुती गायकवाड यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि. २७/११/२०२१ रोजी ते भोर पोलिस स्टेशन येथे पोलिस हवालदार म्हणुन कार्यरत होते. सदर दिवशी ते पोलिस स्टेशन येथे हजर असताना प्राणी संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर सदर गुन्हयाचा तपास तोंडी आदेशान्वये त्यांच्याकडे देण्यात आला. तपासाकामी त्यांच्याकडे फिर्यादी जबाब आणि छापील प्रथम खबर अहवाल इत्यादी कागदपत्रे देण्यात आली. त्यानंतर त्यांनी जनावरांचा पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी आरोपीस फौ.प्र.सं. कलम ४१–अ–१ प्रमाणे नोटिस नि.क्र. ३५ दिली. त्यानंतर मिळुन आलेली गोवंश जनावरे विरालय गोशाळा, जांभुळवाडी येथे जमा केली. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांची तपासटिपणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवली. त्यानंतर आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

१२. बचाव पक्षाने सदर साक्षीदारांचा सविस्तर उलटतपास घेतला. उलटतपासादरम्यान अ.सा.क्र. १ फिर्यादी याने तो हिंदु आघाडी संघटनेचे काम करतो हे दाखवण्यासाठी त्याच्याकडे ओळखपत्र नसल्याचे तसेच त्याचे पोलिसांशी चांगले संबंध असल्याचे त्याने स्पष्ट केले आहे. तसेच त्याने सरतपासात केलेली कथने ए.टी.कॉलेजजवळ तो व त्याचे मित्र कामावरुन येवुन तेथे चहा पिण्यासाठी थांबल्याचे, आरोपीकडे विचारपुस केल्याचे आणि त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे या सर्व बाबी फिर्यादमध्ये नमुद नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. तसेच त्याने सात जनावरांपैकी एक खोंड व सहा जर्शी गाई होत्या हे देखिल फिर्याद मध्ये नमुद नसल्याचे मान्य केले आहे. तसेच त्याने साक्षीदार व तो जवळचे मित्र असुन एकमेकांच्या मदतीसाठी नेहमी हजर होत असल्याचे तसेच ब–याच अशा प्रकारच्या केसेसमध्ये निलेश आवाळे फिर्यादी असल्याचे व तो फिर्यादी व पंच असल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. तसेच त्याने पिकअप गाडी शहाजी मरगळ यांचे नावे होती हे फिर्यादमध्ये नमुद नसल्याचे तसेच सदर जनावरे

आरोपीने खरेदी केली होती हे देखिल फिर्यादमध्ये नमुद नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे.

१३. याव्यतिरीक्त त्याने उलटतपासादरम्यान त्याची फिर्याद कधी घेतली ती वेळ सांगता येणार नसल्याचे, पोलिस स्टेशनला गेल्यानंतर, सदर जनावरे किती वेळ गाडीत असल्याचे सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. महत्वाची बाब म्हणजे त्याने सदर जनावरे त्याच गाडीतुन गो–शाळा येथे नेल्याचे कथन केले आहे. तसेच त्याने सदर जनावरे पोलिसांनी दाटीवाटीने गो–शाळेत नेली म्हणुन त्यांच्याविरुध्द तक्रार दिली नसल्याचे मान्य केले आहे. पुराव्यादरम्यान सदर साक्षीदारास जनावराचे वय, वर्णन सांगता आलेले नाही. एकंदरीत फिर्यादी याचा पुरावा आणि फिर्याद यांचे एकुण अवलोकन करता विसंगती दिसुन येते. अभियोग पक्षाने कुठल्या अधिकाराखाली फिर्यादीने गाडी अडवुन विचारपुस करुन जनावरे पोलिस स्टेशन येथे नेली याचे स्पष्टीकरण दिलेले नाही अथवा त्या अनुषंगाने अभिलेखावर पुरावा दिलेला नाही. एकंदरीत फिर्यादीचा न्यायालयासमक्ष आलेला पुरावा पाहता त्याने आरोपीविरोधात मोघम स्वरुपाची फिर्याद देवुन मोघम स्वरुपाचा पुरावा दिल्याचे स्पष्ट होते.

१४. याव्यतिरीक्त अभियोग पक्षातर्फे सा.क्र. २ याने पुराव्यादरम्यान तो, फिर्यादी आणि त्याचे मित्र पोलिस ठाणे येथे येवुन त्यांनी गुरे भरलेली गाडी थांबवलेली असल्याचे सांगितल्याने घटना ठिकाणी गेला आहे. पुराव्यादरम्यान त्याने गाडी संदर्भाने त्याला काही एक समजले नसल्याचे कथन केले आहे. तसेच फिर्यादी यापुर्वी देखिल गुराबाबत गुन्हे दाखल करण्यासाठी आला असल्याने ओळख असल्याचे कथन केले आहे. पुराव्यादरम्यान त्याने तक्रार देणेसाठी कोण आले अथवा गाडीमधील गुरांबाबत त्याला सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे.

१५. तसेच सा.क्र. ४ हा फिर्यादी याचा मित्र असुन त्याने पुराव्यादरम्यान त्याने मरळ यास विचारणा केली असता त्याने उलट उत्तरे दिली असल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने देखिल गाडी अथवा जनावरांबाबत इतभुंत माहिती न्यायालयासमक्ष सांगितलेली नाही. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ पंच साक्षीदार असुन त्याने पुराव्यादरम्यान त्यास निश्चित कोणत्या पोलिसाला बोलावले हे सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे. तसेच सदर साक्षीदाराने जप्त केलेल्या गुरांची तपशिलवार माहिती सांगणे अपेक्षित असतानाही त्याने जप्त केलेल्या गुरांचे वर्णन तसेच पिकअप गाडीचे वर्णन सांगता येणार नसल्याचे कथन केले आहे.

१६. अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ तपास अधिकारी असुन त्यांनी पुराव्यादरम्यान जनावरांना गो–शाळेत पाठवण्यापुर्वी वैदयकिय तपासणी केली नसल्याचे तसेच जनावरांना गो–शाळेत पाठवण्यापुर्वी संबंधित न्यायालयाची परवानगी घेतली नसल्याचे कथन केले आहे. तसेच त्यांनी उलटतपासादरम्यान तपासण्यात आलेले सर्व साक्षीदार हिंदु आघाडी संघटनेचे सदस्य असल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. महत्वाची बाब म्हणजे त्यांनी आरोपींना त्यांच्या ताब्यातील जनावरे कोठुन, कशी, कशाकरीता नेत होते या संबंधाने तपास करणे अत्यावश्यक होते. परंतु, त्यांनी त्या संदर्भाने तपास केले नसल्याचे कथन केले आहे. याव्यतिरिक्त अभियोगपक्षाने इतर महत्वपुर्ण त्रयस्त साक्षीदारांचा पुरावा न्यायालयासमक्ष आणलेला नाही. महत्वाची बाब म्हणुन जप्ती पंचनामा निशाणी क्र. २६ चे अवलोकन करता गाडी क्रमांकाबाबत खाडाखोड असल्याचे तसेच पंचनाम्याची वेळ मागावुन टाकल्याचे दिसुन येते.

१७. याव्यतिरिक्त अभियोग पक्षाने आरोपींनी पिकअप गाडी क्र. एम.एच. ४२ बी ४२०३ या गाडीमध्ये १ जर्शी बैल ६ जर्शी खोंडे असे एकुण ७ गो वंश जातीची गुरे त्यांना दाटीवाटीने गाडीत कोंबुन कसल्याही चारा पाण्याची सोय न

करता त्यांच्या कत्तलीसाठी नेली ही बाब मौखिक तसेच कागदोपत्री पुराव्याअभावी संशयापलिकडे सिध्द केलेली नाही. अभियोगपक्षाचा खटला आणि न्यायालयासमक्ष आलेला पुरावा यामध्ये विसंगती दिसुन येते. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देणे इष्ट ठरते. म्हणुन मी निष्कर्ष नोंदवते की, अभियोगपक्षाने आरोपीवरील आरोप सबळ पुराव्याअभावी संशयापलिकडे सिध्द केले नाहीत. म्हणुन मी प्रश्न क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

**<u>प्रश्न क्र. २ बाबत.</u>**

१८. प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे नकारार्थी नोंदवल्याने आरोपी निर्दोषमुक्त होण्यास पात्र ठरतात. म्हणुन प्रश्न क्र. २ च्या उत्तराकरीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

:: **आ दे श** ::

०१. आरोपी क्र. १ शहाजी चंद्रकांत मेरगळ व आरोपी क्र. २ तात्या रामा पवार यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र प्राणीरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ),५(ब),९, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधि. १९६० चे कलम ११(१)(डी)(इ), भा.दं.वि. कलम ३४ नुसार गुन्हा केल्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपींनी यापुर्वी दिलेला जामीन कदबा रद्द करुन त्यास खुले करण्यात येते.

०३. जप्त मुद्देमाल महिंद्रा पिकअप गाडी क्र. एम.एच. ४२ बी ४२०३ हे वाहन अपिल कालावधीनंतर अपिल न झाल्यास मुळ मालकास नियमाप्रमाणे परत करण्यात यावे.

०४. जप्त जनावरे अपिल कालावधी नंतर अपिल न झाल्यास त्यांच्या कायदेशीर मालकांच्या ताब्यात नियमाप्रमाणे परत करण्यात यावे.

०५. आरोपींची बंधपत्रे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे पुढील सहा महिनेकरीता कायम ठेवण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लिहणेत व घोषित करण्यात आला.)

JADHAV MEENA WAMAN Digitally signed by JADHAV MEENA WAMAN Date: 2026.07.22 17:49:57 +0530

**ठिकाण : भोर** **(श्रीमती मीना वा. जाधव )**

**दिनांक : २२.०७.२०२६.** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भोर**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | एम.डी.शिरोडे, नि.श्रे. |
| न्यायालयाचे नाव | – | मे. श्रीमती एम.व्ही. जाधव, प्र.वर्ग. न्या.दं. भोर |
| निकाल तारीख | – | २२.०७.२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याची तारीख | – | २२.०७.२०२६ |
| अपलोड केल्याची तारीख | – | २२.०७.२०२६ |